Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-3 | Issue-12 | June-2014 Available online at www.aygrt.isrj.net

' १९७५ नंतर ग्रामीण कवितेतील शेतकरी '

नवनाथ विश्वनाथ पाटोळे

प्राध्यापक.

सारांश - १९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी व आदिवासी हे साहित्यप्रवाह निर्माण झाले. ग्रामीण साहित्य हा प्रवाह १९६० नंतर जास्त चर्चिला गेला. ग्रामीण जीवनाचे चित्रण कथा, कादंबरी बरोबरच कवितेत होऊ लागले.

प्रस्तावना-

प्रसार माध्यमे खेड्यापर्यंत पोहोचल्याने सामाजिक व राजकीय स्वरुपाचे मंथन ग्रामीण भागात सुरु झाले. या सर्वांचा परिणाम ग्रामीण संस्कृतीवर झाला. या सर्वांचे चित्रण १९७५ नंतरच्या कवितेत दिसून येते.

उद्देश :- हा संशोधनात्मक लेख लिहिण्याचा उद्देश असा की, ग्रामीण कवितेची सुरुवात महात्मा फुले व त्यांच्या सहका-यांनी पोवाडे, लावणी, अभंग, खंडकाव्य यासारख्या काव्यांच्या माध्यमातून केली. या काव्यांच्या माध्यमांतून त्यांनी समाजप्रबोधन केले. आंतरिक तळमळीने त्यांनी ज्याप्रमाणे शेतकरी जीवनाचे चित्रण केले. तसेच चित्रण त्यांच्या नंतरच्या पिढीला घडविता आले नाही. ग्रामीण रुढी, परंपारा व निसर्गाचे दर्शन बहिणाबाई बरोबरच डॉ. आनंद यादव (मळयाची माती) , फ. म. शहाजिदे (शेतकरी), विठ्ठल वाघ (काळया मातीत) यासारख्या कवितांमधून केले आहे. १९७५ नंतर राज्यकर्त्यांकडून , प्रचलित समाजव्यवस्थेकडून खेडयातील लोकांची होणारी पिळवणूक जागतिकीकरण, ढाबा संस्कृती, शेतक-यांच्या घरातच तयार होणारी सुशिक्षीत बेकारांची पिढी व या पिढीचे शेतीकडे होणारे दुर्लक्ष या सर्वांचे चित्रण कवितेत येऊ लागले.

ग्रामीण भागातील हा बदलाचा परिणाम शेतकरी वर्गावर झाला. १९७५ नंतरच्या कवितेत हेच वास्तव टिपले आहे. आम्ही काबाडाचे धनी, ' प्रार्थना दयाधना
' ' सातबारा ' ' बळीवंत ' यासारख्या काव्यामधून दिसून येते. ' प्रार्थना दयाधना ' मध्ये शेतक-यांचा दुःख, दारिद्रय, भूक व उपासमारीचा प्रश्न ना. धो. महानोर यांनी मांडला आहे. संपूर्ण जगाला अन्नाचा पुरवठा करणारा शेतकरी मात्र उपाशी राहतो. त्याच्या कष्टाने सर्वांच्या चुली पेटतात. मात्र त्याची चूल बंद असते. याचे चित्रण करतांना महानोर म्हणतात,

" किती ठोसाव्यात काडया ।[१]
चूल पेटता पेटेना ।।
करपल्या भाकरीचा ।
घास गळा उतरेना ।।

अशा प्रकारचे चित्रण केले आहे.

शेतकरी आपल्या रानामध्ये कापूस पिकवितो परंतू त्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजाही पूर्ण होत नाही तो सर्वांना वस्त्र पुरवितो. परंतू त्यालाच कापड मिळत नाही. हे शेतक-याचे वास्तव आहे. या चित्रण ' आम्ही काबाडाचे धनी ' या काव्यसंग्रहातून इंद्रजित भालेराव चित्रीत करतात.

शेती हा शेतक-याचा पिढ्यान् पिढ्या चालत आलेला व्यवसाय आहे. हा व्यवसाय जसा एका पिढीतून दुस-या पिढीकडे संक्रमित होतो, तसेच त्याच्या डोक्यावरचे कर्जही संक्रमित होते. त्यामुळे त्याचा जन्मच कर्जात होतो. तो कर्जातच वाढतो आणि मृत्यूही कर्जातच होतो. एवढे जन्मभर कर्ज असूनही त्याची शेतीवर असणारी निष्ठा कमी होत नाही. पावसाच्या आशेवर तो बी-बियाणांची पेरणी करतो. अशा बळीवंताचे चित्रण श्रीकांत देशमुख पुढील प्रमाणे करतात.

" बळीवंत आम्ही (२)
मातीतला दास
धरलेली कास
मरणाची "

म्हणजेच शेतक-याचा जन्मही मातीत झाला, मातीचा दास म्हणून तो सेवा करतो आणि मृत्यूही त्याचा मातीतच होतो.

शेतक-याच्या कुटूंबामध्ये कुटूंबातील व्यक्ती आणि नाती गोती यांना महत्वाचे स्थान असते. पारंपारिक पध्दतीने चालत आलेले संस्कार, मोठया व्यक्तीकडे आदराने बघणे व त्याच्या प्रतिष्ठतेला धक्का लागणार नाही याविषयी घेतलेली काळजी मुलगा किंवा मुलगी लग्न आल्यानंतर आई वडीलांच्या मनात होणारी घालमेल या सर्वांचे चित्र १९७५ च्या नंतरच्या कवींनी टिपलेला दिसतो. अशाच एका कवितेमध्ये इंद्रजित भालेराव म्हणतात,

" माय-बापानं दोघानं एका जीवानं एकदा (३)
ठरविले याचे हात चार करायचे यंदा
माय करी झाकपाक झाले जेवण खावन
हाळू हाळू केल सुरु गोष्टी सांगनं बापानं."

म्हणजेच मुलगा किंवा मुलीचे आई वडील त्यांची लग्न करुन जबाबदारीतून मुक्त होऊन आपल्या खांद्यावरील जबाबदारी मुलाच्या खांद्यावर टाकतात. त्यांचे तसलं चित्रण १९७५ नंतरच्या कवितेत दिसून येते.

१९६० नंतर दलित साहित्य प्रवाहाचा विकास होत गेला. दलित लोकांच्या जीवनातील वास्तव कथा, कादंबरी, आत्मकथन या बरोबरच दलित कवितेतही आले. दलित कवितेने मध्यमवर्गीय जीवन व सौंदर्य नाकारले. त्याच प्रमाणे रुढी परंपरे विरुध्द दंड थोपटले. म्हणजेच दलित कवितेमध्ये विद्रोहाची भावना निर्माण झाली. अशीच विद्रोहाची भावना ग्रामीण जीवनात आलेली दिसते. देशाला जरी स्वातंत्र्य मिळाले तरी पारतंत्र्यामध्ये असणारे प्रश्न शेतक-यांचे स्वातंत्र्य नंतर ही आहे तसे राहिले. भारत हा लोकशाही प्रधान असला तरी या लोकशाहीने शेतक-याला न्याय दिलेला नाही. या विषयी नारायण सुमंत आपल्या कवितेत म्हणतात.

" मला सोबत बाजारात (४)
तुझी वेदना ही मांड
पिळणाचा तर एक
चर काशी भांड "

शेतक-याच्या मालाला बाजारात भाव मिळत नाही म्हणून दुःख होते. तसाच व्यवहार त्याच्या जीवनातही होताना दिसतो.

शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे वावरात पेरणी करणे, बि-बियाणे रुजवणे हे त्याच्या हातात असते. परंतू पिकाचे कितीही पालनपोषण केले तरी पीक हाताला लागेल याची खात्री नसते. म्हणजे तो एक प्रकारचा जुगारच खेळत असतो. पीक हातात नाही लागले तर तो निराश होत असतो. सावकाराकडून, बँकांकडून घेतलेले कर्ज फेडू शकत नाही. ऊस ज्या प्रकारे चरख्यामध्ये पिळला जातो जसा तोही त्याच्या आयुष्य चरख्यामध्ये पिळले जाते. त्याला होणारे दुःख , वेदना, निराशा, असहय होते आणि तो आत्महत्या करतो. याविषयीचे वर्णन करताना नारायण सुमंत म्हणतात ३

" कुणी स्ट्रॉबेरी (५)
कुणी द्राक्षे
तर कुणी पळाटी
आणि तू तर शहीद झालास कांद्यासाठी "

अशा प्रकारचे शेतक-यांचे आत्महत्येचे चित्रण १९७५ नंतरच्या कवितेत चित्रीत होताना दिसून येते.

१९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेला ग्रामीण बोलीचा देशीयतेचा अस्सल बाज लागलेला आहे. ग्रामीण भागामध्ये असणारे शब्द ग्रामीण भागामध्ये असणारे वास्तवता, निसर्ग, वातावरण माणसा माणसामध्ये असलेले संघर्ष, माणसा माणसामध्ये असणारे माणूसकीचे चित्रण करीत असताना कोणाचेही अनुकरण करताना दिसत नाही.

खेडयामध्ये राहणारे लोक एकमेकांवर अपार माया करतात. यालाच आजचा सुशिक्षीत समाज प्रबोधतो. खेडयामध्ये आईची मुलांवर असणारी माया बहीण भावाची माया त्या पध्दतीने तसेच पती पत्नीचे एकमेकांवर असणारे प्रेम या सर्वांमध्ये समजूतदारपणा दिसून येतो. त्या एकमेकांबद्दल जिव्हाळा, आपुलकी दिसून येते. अशाच पती-पत्नीच्या मनातील भाव टिपताना कवी म्हणतो ३

" लाजू नकोस सगुणे मला समजलं काय (६)
तुझ्या पोटाला फुटले दोन लुसूलुसू पाय
पाय उचल धीरानं नको उचलूस भारा
पोटामधल्या बाळाला पोट वाटू दे गाभाय ."

अशा प्रकारचे चित्रण १९७५ नंतरच्या कवितेत दिसून येते.

अभ्यास निष्कर्ष :-

१) १९७५ नंतरच्या कवितेत शेतक-यांवर असलेल्या कर्जाचे चित्रण येते.
२) या कालखंडातील कवितांमध्ये शेतक-यांच्या नातेसबंधाचे चित्रण येते.
३) जागतिकीकरणाचा शेतक-याच्या जीवनावर झालेला परिणाम १९७५ नंतरच्या कवितेत दिसून येतो.
४)शेतक-यांच्या मालाला बाजारभाव न मिळाल्याने त्याला आलेल्या दु:खाचे, नैराश्याचे चित्रण या कालखंडातील कवितेत जाणवतो.
५)दुष्काळाचा शेतक-यावर झालेला परिणाम या कवितांमध्ये व्यक्त केला आहे.
६)शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येचे चित्रण वास्तवपणे १९७५ च्या कवितेत दिसून येतो.

समारोप :-

एकूण १९७५ नंतरच्या कवितेत शेतक-याच्या दु:ख, दारिद्रय, दैना यांचे चित्रण आले आहे. हे दु:ख एकटया शेतक-याचे नसून सगळया कुटूंबाचे असते. त्याच प्रमाणे स्वत:वर झालेल्या अन्याया विरुध्द प्रतिनिधी रुपातून शेतकरी जाब विचारतो. शेतक-यांच्या मुलाचे सुशिक्षीतांची एक फौज निर्माण झाली असल्यामुळे ' ना ग्रामीण, ना शहरी ' अशी सध्याची अवस्था दिसून येते. अशा मानसिकतेचे चित्रण ग्रामीण कवितेत यायला हवे. त्याच बरोबर सध्याच्या शेतक-यांच्या ख-या दु:खाचे चित्रण कवितेत आले तरच ग्रामीण कविता समृध्द होईल.

संदर्भ :-

१. सौ. हेमलता गायकवाड, आधुनिक मराठी ग्रामीण कविता, फडके प्रकाशन प्र.आ. १९९७.

२.कैलास सार्वेकर , मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे प्र.आ. १९९९.
३. डॉ. वामन जाधव, ग्रामीण साहित्य : प्रवाह आणि परिस्थिती, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ. २०१३.

कविता संग्रह :-

१.ना. धो. महानोर, प्रार्थना दयाघना, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई दु.आ. १९९४ पृ. ३१
२. श्रीकांत देशमुख , बळीवंत, केदार प्रकाशन, पुणे. प्र.आ. १९९७ पृ.९१
३. इंद्रजीत भालेराव, आम्ही काबाडाचे धनी, बी रघुनाथ प्रकाशन, परभणी, दु.आ. १९९५ पृ. २९.
४. नारायण सुमंत, सातबारा, श्री विद्या प्रकाशन, पुणे प्र.आ. २००२ पृ.१३
५. नारायण सुमंत, सातबारा, श्री विद्या प्रकाशन, पुणे प्र.आ. २००२ पृ.४३
६. इंद्रजीत भालेराव, आम्ही काबाडाचे धनी, बी रघुनाथ प्रकाशन, परभणी, दु.आ. १९९५ पृ. २७.